पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्था, नवी मुंबई महानगरपालिका, नेरूळ, नवी मुंबई-४०० ४०६ नविन वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक. एमईडी १०२२/प्र.क्र.२२४/२२/शिक्षण-२**
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
**दिनांक:-२७/०९/२०२४**

वाचा:-

१. शासनाची आवश्यकता प्रमाणपत्रे, दि.१९/०७/२०२२.
२. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.N-१९०११/३२/२०२४- Assessment Cell/ MARB (८२३८७४४), दि.०९/०९/२०२४
३. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.N-१९०११/३२/२०२४- Assessment Cell/ MARB (८२३८७४४), दि.०९/०९/२०२४.
४. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.N-१९०११/३२/२०२४- Assessment Cell/ MARB (८२३८७४४), दि.०९/०९/२०२४.
५. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.N-१९०११/३२/२०२४- Assessment Cell/ MARB (८२३८७४४), दि.०९/०९/२०२४.

प्रस्तावना:- पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्था, नवी मुंबई, महानगरपालिका, नेरुळ, नवी मुंबई या संस्थेस नवीन वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याकरिता संदर्भ क्र.१ येथील शासन पत्रांन्वये आवश्यकता प्रमाणपत्रे देण्यात आली होती. सदर आवश्यकता प्रमाणपत्रांच्या अनुषंगाने राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र.२ ते ५ अन्वये मंजूरी (Letter of Permission) दिली आहे. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मंजूरीच्या अनुषंगाने प्रस्तावित संस्थेस नवीन वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याकरिता मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्रमांक २ ते ५ अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन याद्वारे पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्था, नवी मुंबई, महानगरपालिका, नेरुळ, नवी मुंबई या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता पुढीलप्रमाणे नवीन वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याकरिता शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १. | MS (Obstetrics & Gynecology) | ०८ |
| २. | MD (Paediatrics) | ०४ |
| ३. | MD (General Medicine) | ०३ |
| ४. | MS (Orthopaedics) | ०२ |

<u>अटी व शर्ती:-</u>

१. प्रस्तावित वैद्यकीय महाविद्यालयातील उक्त वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची विद्यार्थी प्रवेश क्षमता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी निर्धारित केल्यानुसार राहिल.

२. राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय/मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३. शासकीय नियम/कायदा तसेच, मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४. केंद्र शासन, राज्य शासन, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे सदर जागांकरिता संलग्निकरण प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेशित करण्यात येऊ नयेत.

६. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करू नये.

७. सदर जागांवर प्रवेशित उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमांनुसार विद्यावेतन लागू राहील.

३. सदर शासन निर्णय राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांच्या संदर्भ क्र. २ ते ५ येथील पत्रांन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०९२७१४२५४७२०१३ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT TUKARAM SASULKAR

Digitally signed by AJIT TUKARAM SASULKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=09df106c443b4977e7463338fa58f736fdb4fe137863b178345a5ead34dbfb12, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=71214F99804ABAAE1EA28D5F794C1BA337889880D0C567C29D025934340956DF, cn=AJIT TUKARAM SASULKAR
Date: 2024.09.27 15:16:54 +05'30'

**(अजित सासुलकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई

२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, भारत सरकार, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, निर्माण भवन, नवी दिल्ली-११००११
१०. सचिव,राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, पॉकेट-१४,सेक्टर-८,द्वारका फेस-१,नवी दिल्ली-११००७७
११. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१३. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१४. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई
१५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
१६. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
१७. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
१८. अधिष्ठाता, पदव्युत्तर पदवी शिक्षण संस्था, नवी मुंबई महानगरपालिका, नेरूळ, नवी मुंबई-४०० ४०६
१९. निवडनस्ती (शिक्षण-२)

पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्था, नवी मुंबई, नवी मुंबई महानगरपालिका, नेरुळ, नवी मुंबई.

---------------------------------

नवीन वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक. एमईडी १०२४/प्र.क्र.३३४/२४/शिक्षण-२**

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

दिनांक:- १६/१२/२०२४

संदर्भ:- १. शासनाचे आवश्यकता प्रमाणपत्र क्र. एमईडी-१०२२/प्र.क्र. २४४/२२/शि-२, दि. १९/०७/२०२२.

२. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. N-२३०११/३२/२०२४-Assessment Cell/MARB(८२३८७४४)/I/३७२७१७०/२०२४, दि.०२/१२/२०२४.

<u>प्रस्तावना :-</u> पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्था, नवी मुंबई, नवी मुंबई महानगरपालिका, नेरुळ, नवी मुंबई या संस्थेस MS (General Surgery) हा नवीन वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी संदर्भ क्र.१ येथे नमूद शासन पत्रान्वये आवश्यकता प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर आवश्यकता प्रमाणपत्राच्या अनुषंगाने राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र. २ येथे नमूद पत्रान्वये मंजूरी (Letter of Permission) प्रदान केली आहे. सदर मंजूरीच्या अनुषंगाने उक्त संस्थेमध्ये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u> राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र. २ येथे नमूद पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, शासन याद्वारे पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्था, नवी मुंबई, नवी मुंबई महानगरपालिका, नेरुळ, नवी मुंबई या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता MS-General Surgery हा नवीन वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम ०४ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देत आहे:-

१. सदर वैद्यकीय महाविद्यालयातील MS (General Surgery) या वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने निर्धारित केल्यानुसार ०४ इतकी राहील.

२. राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय/मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी.

३. शासकीय नियम/कायदा तसेच, मा. मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवळी भाग असेल.

४. केंद्र शासन, राज्य शासन, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी उक्त अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५. संस्थेने उक्त अभ्यासक्रमांस महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थी प्रवेशित करावेत.

६. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करू नये.

७. सदर जागांवर प्रवेशित उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमांनुसार विद्यावेतन लागू राहील.

२. सदर शासन निर्णय राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांच्या संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ. तुषार पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
७) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
८) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

९) सचिव, भारत सरकार, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, निर्माण भवन, नवी दिल्ली-११० ००१

१०) सचिव, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, पॉकेट-१४, सेक्टर-८, व्दारका फेस-१, नवी दिल्ली-११० ०७७

११) प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय यांचे स्वीय सहाय्यक

१२) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई

१३) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई

१४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

१५) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई

१६) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

१७) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई

१८) अधिष्ठाता, पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्था, नवी मुंबई, नवी मुंबई महानगरपालिका, नेरुळ, नवी मुंबई

१९) निवडनस्ती (शिक्षण-२)

पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्था, नवी मुंबई, नवी मुंबई महानगरपालिका, नेरुळ, नवी मुंबई

-----------------------------------

नवीन वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक. एमईडी १०२४/प्र.क्र.३३४/२४/शिक्षण-२**

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

दिनांक:- १९/१२/२०२४

संदर्भ:- १. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. N-१९०११/३२/२०२३-Assessment Cell/MARB (८२३८७४४), दि.०९/०९/२०२४.

२. शासन निर्णय क्र. एमईडी-१०२२/प्र.क्र. २४४/२२/शि-२, दि. २७/०९/२०२४.

३. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. N-१९०११/३२/२०२३-PGMARB (e- ID- ८२३८७४४), दि.०९/१२/२०२४.

**प्रस्तावना :-** राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या संदर्भ क्र.०१ येथील पत्रास अनुसरुन पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्था, नवी मुंबई, नवी मुंबई महानगरपालिका, नेरुळ, नवी मुंबई या संस्थेस MD (General Medicine) हा नवीन वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम ०३ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यासाठी संदर्भ क्र.०२ येथे नमूद शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या संदर्भ क्र. ०१ येथील पत्राविरुद्ध संस्थेने अपील केले होते. सदर अपीलास अनुसरुन राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने संदर्भ क्र.०३ येथील पत्रान्वये (Letter of Permission) पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्था, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून MD General Medicine हा नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम ०४ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास सुधारीत परवानगी दिली आहे.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांच्या सुधारीत परवानगीस अनुसरुन पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्था, नवी मुंबई, नवी मुंबई महानगरपालिका, नेरुळ, नवी मुंबई या संस्थेस संदर्भ क्र. ०२ येथे नमूद शासन निर्णयान्वये MD- General Medicine-०३ जागा या वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरीता दिलेली मान्यता रद्द करुन, उक्त संस्थेमध्ये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरीता MD- General Medicine हा नवीन वैद्यकीय पदव्युत्तर पदवी

अभ्यासक्रम ०४ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी उपरोक्त संदर्भ क्र. ०३ येथे नमूद पत्रान्वये दिलेली सुधारीत मान्यता विचारात घेऊन, शासन याद्वारे पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्था, नवी मुंबई, नवी मुंबई महानगरपालिका, नेरुळ, नवी मुंबई या संस्थेस सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता MD- General Medicine हा नवीन वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम ०४ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देत आहे: -

१. सदर वैद्यकीय महाविद्यालयातील MD (General Medicine) या वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने निर्धारित केल्यानुसार ०४ इतकी राहील.

२. राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय/मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी.

३. शासकीय नियम/कायदा तसेच, मा. मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवळी भाग असेल.

४. केंद्र शासन, राज्य शासन, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी उक्त अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५. संस्थेने उक्त अभ्यासक्रमांस महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थी प्रवेशित करावेत.

६. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करू नये.

७. सदर जागांवर प्रवेशित उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमांनुसार विद्यावेतन लागू राहील.

२. सदर शासन निर्णय राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांच्या संदर्भाधीन क्र.३ येथील पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ. तुषार पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
७) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
८) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
९) सचिव, भारत सरकार, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, निर्माण भवन, नवी दिल्ली- ११० ००१
१०) सचिव, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, पॉकेट-१४, सेक्टर-८, व्दारका फेस-१, नवी दिल्ली- ११० ०७७
११) प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय यांचे स्वीय सहाय्यक
१२) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१३) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई
१४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१५) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
१६) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
१७) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
१८) अधिष्ठाता, पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण संस्था, नवी मुंबई, नवी मुंबई महानगरपालिका, नेरुळ, नवी मुंबई
१९) निवडनस्ती (शिक्षण-२)